भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र.३३०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १४/०५/२०१७

**१) सार्वजनीक ठिकाणी महिलेस अश्लिल शब्दात शिवीगाळ केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १२/०५/२०१७ चे २१.०० वा. ते २१.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी ही लघवी लागल्याने तिचे घरासमोरील अंगणात लघवी करीत असतांना आरोपी हा दारु पिवुन येवुन फिर्यादीस पाहुण तिचे नवऱ्यास तुझी बायको कोठे आहे असे बोलुन फिर्यादीस तु केव्हा पासुन समता सैनीक दलाची अध्यक्ष झाली असे म्हणुन अश्लिल शब्दात सार्वजनिक ठिकाणी लोकांसमोर शिवीगाळ केली तसेच घराजवळील दुसऱ्या महिलेस सुध्दा अश्लिल शब्दात शिवीगाळ केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे. साकोली येथे कलम २९४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मेश्राम पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**२) मोटार रॉग साईडने चालवुन मोटार सायकला धडक देवुन स्वत: व मोटार सायकल चालक जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०५/०५/२०१७ चे १९.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी ग्यानीराम कवळुजी गाढवे वय ५८ वर्ष, रा. प्रगती कॉलोनी भंडारा याचा पुतण्या जखमी सुमित श्रीराम गाढवे वय २७ वर्ष, रा. तुमसर हा आपले होंडा स्टनर मोटार सायकल क्र. एमएच ३२/एन १३८७ नी लाखनी वरुन भंडाराकडे आपले बाजुने येत असता भंडारा कडुन येणाऱ्या आरोपी वाहण चालकाने आपले ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने व रॉग साईडने चालवुन जखमीचे मोटार सायकल वैनगंगा पुलीया जवळ भंडारा येथे धडक मारुन फिर्यादीचे पुतण्यास जखमी करुन व स्वत: जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोस्टे. कारधा येथे कलम २७९,३३७,३३८ भांदवि. सहकलम १८४/१७७ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**३) मोटार सायकल चालकांच्या निष्काळजीपणामुळे इसमाचे मरणास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०७/०५/२०१७ चे १०.०० वा. दरम्यान यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने हयगयीने व निष्काळजी पने चालवुन समोरुन येणाऱ्या मोटार सायकला खडकी येथे धडक मारुन मोटार सायकल चालक शैलेश अंताराम केवट वय ३२ वर्ष, रा. बेलगाव पो.स्टे. कारधा यास गंभिर जखमी केल्याने त्यास औषधोपचारा करीता डॉ. नाखाडे भंडारा यांचे कडे औषधोपचारा करुन पुढील उपचारास मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने फिर्यादी विष्णु श्रावण मेश्राम वय ३९ वर्ष, रा ढिवरवाडा यांचे बयान व पो. स्टे. भंडारा येथुन कागदपत्रा वरुन पोस्टे. करडी येथे कलम २७९,३०४(अ) भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सोलंकी पो. स्टे. करडी हे करीत आहेत.

**४) संगनमत करुन घरात प्रवेश करुन मोबाईलची चोरी . :—**

दिनांक १३/०५/२०१७ चे ०१.०० ते ०३.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी नवीन प्रल्हाद अग्रवाल वय ३३ वर्ष, रा. शिवनगर तुमसर हे आपले घराचा दरवाजा खुला करुन झोपले असतांना यातील दोन विधी संघर्ष गस्त बालक यांनी संगनमत करुन घरात प्रवेश करुन घरात ठेवलेला १ ओपो एफवन १५ कंपनीचा मोबाईल किंमती १७,९९०/—रु. ओपो कंपनीचा मोबाईल किंमती १०,०००/—रु. असा एकुण २७,९९०/—रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे. तुमसर येथे कलम ३८०,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. जाधव पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**५) आजाराला कंटाळुन गळफास लावुन इसमाचा मृत्यु. :—**

दिनांक १२/०५/२०१७ चे १०.३० ते २२.२० वा दरम्यान यातील मृतक किशोर गोपाळ शहारे वय ४९ वर्ष, रा. झोंडा चौक वार्ड नं. ०२ सेंदुरवाफा हा अंदाजे ०६ महिण्यापासुन लकव्याच्या आजाराने व पागल पणाने आजारी असुन लंजे, डॉ. राधेश्याम व भंडारा येथील डॉक्टर यांचेकडे उपचार करुन सुध्दा आजार बरा झाला नाही प्रकृती बरी न झाल्याने वारंवार घरी मी मरुन जाईन असे बोलत होता मृतकने आजाराला कंटाळुन त्याचे राहते घराचे मागील खोलीचे लाकडी फाटयाला दोराने बांधुन स्वत: गळफास लावुन मरण पावला असुन त्याचे मरणाबाबत कुणावरीही संशय नाही असे फिर्यादी सौरभ किशोर शहारे वय १९ वर्ष, रा. सेंदुरवाफा यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे साकोली येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भजने पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**६) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक १३/०५/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ९७ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०५, तीन सिटर वाहनांवरती १४ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ७८ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

14-5

(के.एम.हत्तीमारे)
सपोनी. जिवीशा भंडारा
दुरध्वनी.क्र८६६८६९५६३५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.